# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मुंबई ते नवी मुंबई सिडको मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्याबाबत

**(१) ४४६६२ (१०-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा ते सेंट्रल पार्क मेट्रो रेल्वे, मुंबईला नवी मुंबईशी जलवाहतुकीद्वारे जोडणारी नेरूळ जेटी प्रकल्प, पेंधर ते खारघर मेट्रो प्रकल्प सुरू करण्यासाठी सिडकोने १ मे हा दिवस निश्चित केला असून, उद्घाटनासाठी शासनाकडून वेळ मिळत नसल्यामुळे सिडकोचे प्रकल्प उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी महामेट्रोनेही दिनांक २६ जानेवारी, २०२२ रोजी उपरोक्त मेट्रो सेवा सुरू होईल असे निश्चित केले होते, मात्र याही वेळी शासनाकडून वेळ न मिळाल्याने मेट्रो सेवा सुरु होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या श्रेयवादातून मेट्रो रेल्वेचे उद्घाटन लांबत चालले असून या परिसरातील औद्योगिक वसाहतींमध्ये राहणाऱ्या हजारो कामगार आणि रहिवाशांना मेट्रोअभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांकडे दुर्लक्ष झाल्याने कोट्यवधी रुपयांची मालमत्तेचा वापर होण्याकरीता, सदरहू मेट्रो रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४) बेलापूर ते तळोजा या नवी मुंबई मेट्रो लाईन-१ ही मार्गिका दि.१७.११.२०२३ रोजी व्यावसायिक वापराकरिता सुरु करण्यात आली आहे.

नवी मुंबईत जल वाहतुकीकरीता, नेरुळ येथे प्रवासी जल वाहतुक टर्मिनसचे काम दि.३१.१०.२०२१ रोजी पूर्ण झाले आहे. मेरीटाईम बोर्डाने नेरुळ-भाऊचा धक्का, नेरुळ-एलिफंटा, नेरुळ-जेएनपीटी अशा वाहतुकीकरिता जलसेवा देणा-या संस्थांना परवाना जारी करण्यात आला आहे. सिडको संचालक मंडळाच्या मान्यतेने जलवाहतुक परिचालक नेमणुकीसाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नवीन पनवेल (नवी मुंबई) नोडल कार्यालयातील सिडकोचे अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना लाच देताना पकडल्याबाबत

**(२) ४९५५५ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल (नवी मुंबई) नोडल कार्यालयातील सिडकोचे अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना १५ हजाराची लाच देतानाची बाब निदर्शनास येवूनही लाच लूचपत प्रतिबंधक (ACB) विभागाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२४) :** (१) व (२) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई यांनी सिडको महामंडळाच्या पनवेल विभागीय कार्यालयात श्री. प्रकाश मोहिले, अधिक्षक अभियंता व श्री.संजय देकाटे, सहा.कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द दि.२३ सप्टेंबर, २०२२ रोजी सापळा रचून अटक केली. त्यांच्याविरुध्द खांदेश्वर पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.२५०/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

श्री.प्रकाश मोहिले यांना दि.२४ सप्टेंबर, २०२२ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्री.संजय देकाटे हे सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. या प्रकरणाची दक्षता विभाग, सिडको यांच्यामार्फत चौकशी सुरु असून श्री. प्रकाश मोहिले यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शिवडी - न्हावाशेवा पारबंदर प्रकल्प (एमटीएचएल) प्रकल्पाबाबत

**(३) ५११२५ (२०-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी-न्हावाशेवा पारबंदर प्रकल्प (एमटीएचएल) माहे डिसेंबर, २०२३ मध्ये पूर्ण होणार असून सदर प्रकल्प पूर्वमुक्त मार्गास जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्हावाशेवा येथील चिर्ले परिसरात बहुउद्देशीय विकास केंद्र विकसित करण्याचाही निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०२-२०२४) :**(१), (२) व (३) होय हे खरे आहे.

प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुंबई पारबंदर प्रकल्पामुळे मौजे चिर्ले आणि सभोवतालच्या परिसराचा झपाटयाने विकास होण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेशातील मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रासह एकूण ७ क्षेत्रांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० मधील तरतूदीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकारण म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव दिनांक १३ मे, २०२२ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

---

### राज्यातील ६० वर्षावरील सर्व स्त्री पुरुष ज्येष्ठ नागरिकांना प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(४) ५१९०९ (२५-०१-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ६० वर्षावरील सर्व स्त्री पुरुष ज्येष्ठ नागरिकांना दारिद्र्य रेषेची अट काढून सर्वांना आर्थिक लाभाच्या योजनेतून किमान रुपये ३००० मिळावेत तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र आयुक्तालय व स्वतंत्र मंत्रालय स्थापन करुन ज्येष्ठ नागरिक सुरक्षा कायदा २००७ ची अंमलबजावणी सर्वत्र करावी अशा मागणी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाने शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मातापिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ केंद्र शासनाने पारित केला असून सदर कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

त्यानुसार आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणसाठी नियम २०१० तयार करण्यात आले आहेत.

ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांचा वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा.समाजामध्ये त्यांचे जीवन सुसहय व्हावे, शारिरीक/मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे यासाठी महाराष्ट्राचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ च्या अंमलबजावणीसाठी दिनांक ०९ जुलै,२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार सर्व संबंधित विभागांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटुंबात नांव असलेल्या अथवा रु. २१,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील पात्र लाभार्थ्यांस दरमहा रु. १०००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

विभागाअंतर्गत राज्यात ३१ सर्वसाधारण वृध्दाश्रम, २३ मातोश्री वृध्दाश्रम स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत.सदर वृध्दाश्रमातील वृध्दांना भोजन,कपडे बेडींग साहित्य, औषधोपचार इ. सोयी पुरविण्यासाठी प्रतीमाह प्रतीवृध्द रु. १५००/-परिपोषण अनुदान देण्यात येते.

परिपोषण /निर्वाह भत्यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारांवर कार्यवाही करण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत दिनांक २८ सप्टेंबर,२०१० च्या अधिसूचनेव्दारे राज्यातील सर्व जिल्हयांच्या प्रत्येक उपविभागासाठी न्यायाधिकरण गठीत करण्यात आलेले आहे. या न्यायाधिकरणासाठी पिठासीन अधिकारी म्हणूनसंबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ज्येष्ठ नागरिक अधिनियम,२००७ च्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दि.४ मे, २०११ च्या अधिसुचनेनुसार, सर्व जिल्हयांच्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना संबंधित जिल्हयांच्या निर्वाह न्यायाधिकरण आणि अपिलीय न्यायाधिकरणाच्या कामकाजात अधिनियम तथा नियमाची अंमलबजावणीची कार्यवाही करण्यासाठी तथा ज्येष्ठ नागरिक /पालक अर्जदाराची इच्छा असल्यास त्याची निर्वाह न्यायाधिकरण किंवा अपिलीय न्यायाधिकरणात बाजू मांडण्यासाठी निर्वाह अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांचय चरितार्थ व कल्याणसाठीचे अधिनियम २००७ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य परिषद व जिल्हा समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सर्वसामावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण २०१३ ची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक कार्यकारी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

भारत सरकार, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था (एनआयएसडी) आणि राज्य सरकार यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन Elder Line Project (१४५६७) पुणे येथे स्थापित करण्यात आली आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वृध्द व अपंगासाठी गृहे या उद्दिष्टासाठी एकूण रु. ७.२६ कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे ज्येष्ठ नागरिक कायदा, २००७ ची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत असल्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र आयुक्तालय व स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेतील कामगार वर्गाचा कोर्टाचा निकाल मान्य करुन कामगारांना योग्य न्याय देणेबाबत**

**(५) ५३२४५ (१९-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेतील कामगार वर्गाचा कोर्टाचा निकाल मान्य करुन सर्व कामगार वर्गाला तोच निकाल लागू करुन आर्थिक शोषण बंद करुन योग्य न्याय देणेबाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय वाहतूक भवन, मुंबई सेंट्रल, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०२-२०२४) :** (१), (२) व (३) होय.

मा.औद्योगिक न्यायालय ठाणे येथे दाखल केलेली तक्रार युएलपी क्र.२६२/२०१५ मधील आदेशाविरुध्द रा.प.महामंडळाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.२९४०६ /२०२२ दाखल केली आहे.

सदरचे प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ असल्याने चौकशी वा निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य राज्य परिवहन महामंडळाच्या मराठवाडा विभागात नोकऱ्यांमधील खुल्या जागांवर विविध मागास घटकांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याबाबत**

**(६) ५४०७४ (१९-०१-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मराठवाडा विभागात नोकऱ्यांमधील खुल्या जागांवर विविध मागास घटकांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बदल्यामुळे रोस्टर पूर्ण झाले असून एसटीत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नोकरभरती रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या रोस्टरप्रमाणे मराठवाडयात खुल्या प्रवर्गासाठी ४८ टक्के जागा राखीव आहेत व येथील रोष्टर २० टक्के पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडा विभागात खुल्या प्रवर्गाची नोकरभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२४) :** (१) व (२) नाही.

(३), (४) व (५) रा.प.महामंडळामध्ये मराठवाडा प्रदेशातील विभागाचे सरळसेवा बिंदुनामावली (रोष्टर) नोंदवह्याचे संवर्गनिहाय प्रमाणिकरण करुन घेण्यात आलेले आहे. तसेच रा.प.महामंडळात खुल्या प्रवर्गासह सर्व प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणानुसार जाहिरात प्रसिध्द करुन सरळसेवा भरती प्रक्रिया राबविली जाते. भविष्यात आवश्यकता भासल्यास रा.प.महामंडळ शासनाच्या मान्यतेने सरळसेवा भरती प्रक्रिया राबवू शकते.

---

### राज्य परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करण्याबाबत

**(७) ५७४५४ (२६-०४-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळातील माहे जानेवारी, २०२० ते माहे सप्टेंबर, २०२२ या कालावधीतील सेवानिवृत्त अधिकारी तथा कर्मचारी यांची रजा वेतन व वेतनवाढ फरकाची रक्कम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रा.प. कर्मचाऱ्यांस परिवहन महामंडळाच्या निधीच्या उपलब्धतेनुर टप्प्याटप्प्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवृत्तीनंतरची रजा रोखीकरण व करार हप्ते अदा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार उर्वरीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२४) :** (१) व (२) होय.

(३) व (४) जानेवारी, २०२० ते ऑक्टोबर, २०२० या १० महिन्यांच्या कालावधीतील सेवानिवृत्त अधिकारी तथा कर्मचारी यांची रजा वेतन व वेतन वाढ फरकाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार एस.टी कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देयके अदा करण्याची कार्यवाही चालू आहे. रा.प. महामंडळाच्या दैनंदिन वाहतूक उत्पन्नामधून विहीत प्रलंबित रक्कम अदा करण्यात येत आहे.

---

### सोलापूर शहरातील होटगी येथील विमानतळ कार्यान्वित करण्याबाबत

**(८) ५७९७० (२६-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याची मागणी शहरातील स्थानिक लोकप्रतिनिधीनी सन २०२२ मध्ये झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत करून ही अद्याप विमान सेवा कार्यान्वित झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजीच्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरातील होडगी रोड वरील विमानतळावरून विमान सेवा तातडीने सुरु न झाल्यास स्थानिक व्यापारी आणि जनतेने आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सोलापूर (होटगी) विमानतळ हा भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली असून, या विमानतळाच्या विकासाला अडसर ठरणारी श्री. सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी दि.१५.०६.२०२३ रोजी पाडण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समितीचे निधीतून विमानतळाच्या सुरक्षा भिंती लगत बाहेरील बाजूने असलेले ७ इलेक्ट्रिक पोल ची लाईन भूमी अंतर्गत टाकण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. बी.एस.एल.एल. विभागाने टॉवर ची ऊंची कमी केलेली आहे. रेल्वे विभागाकडून रेल्वे च्या मास्ट ची ऊंची कमी करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. ड्रेनेज कनेक्शन, नळ कनेक्शन ची कार्यवाही सुरु आहे.

सोलापूर विमानतळाचे रनवे व टॅक्सीवे चे रिकारपेटींग, ॲप्रन पेरीमीटर रोड चे विस्तारीकरण, बाऊंड्री वॉल चे बांधकाम, तसेच टर्मिनल बिल्डींगच्या ॲम्बुलन्स व CFT च्या शेड, फायर ऑफीस, कार पार्क, फायर पीट , इलेक्ट्रीक कामे आणि विविध कामे सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक वाहकाच्या भत्त्यात वाढ करणेबाबत

**(९) ५८१४६ (२८-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: धुळे, बुलढाणा जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक वाहकाला मुक्कामी बस घेऊन जाण्यास अवघा ७५ रुपये भत्ता मिळत असून, मुक्कामी राहण्यासाठी त्यांना १५० रुपयांपेक्षा जास्तीचा खर्च लागत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात प्रवाशांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने वाहक चालकास रात्री मुक्कामी बसगाडया घेऊन गावोगावी पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढती महागाई लक्षात घेता एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मिळणारा भत्ता हा तुटपुंजा असून मुक्कामी जाणाऱ्या चालक व वाहकाचा खर्च त्यापेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एसटी महामंडळ चालक व वाहक कर्मचाऱ्यांच्या भत्याच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०२-२०२४) :** (१),(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक यांना दि.३० जून,२०१८ च्या परिपत्रकीय सूचनांनुसार सुधारित दराने रात्रवस्ती भत्ता जुलै-२०१८ पासून अदा करण्यात येत आहे.

कामगार करार सन २०१६-२०२० या करारास अंतिम स्वरुप येत नसल्याने तसेच रा.प.महामंडळ व मान्यताप्राप्त संघटना यामध्ये समेट न झाल्यामुळे मा.कामगार आयुक्तांनी सदर प्रकरण मा.औद्योगिक न्याधिकरण, मुंबई यांच्याकडे वर्ग केले असून सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.

---

### मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खाडी किनारी वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना वीज पुरवठा करण्याबाबत

**(१०) ५८५१२ (२१-०४-२०२३). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, तारोडी, पाली, भाईंदर पूर्व येथील नवघर गाव ही गावे समुद्र व खाडी किना-यावर वसलेली असल्यामुळे सागरी क्षेत्र नियंत्रात येत असल्याने सदर गावांना वर्षानुवर्षे वीज पुरवठा करण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा व्हावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. राज्यमंत्री, पर्यावरण विभाग यांना निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उत्तन, चौक, तारोडी, पाली, भाईंदर पूर्व येथील नवघर या गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. व मे.टाटा पॉवर लि. कंपनी यांच्यामार्फत विद्युत पुरवठा करण्यात येतो. विज पुरवठा करणारे क्षेत्र सागरी/CRZ बाधीत क्षेत्रात येत असल्यास सदर कंपनीमार्फत पर्यावरण विभागाच्या आवश्यक परवानग्या घेऊन विज पुरवठा केला जातो.

---

### पवना आणि इंद्रायणी (पिंपरी) नदी सुधार प्रकल्पाबाबत

**(११) ६२९०२ (१२-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना आणि इंद्रायणी (पिंपरी) नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी कर्जरोखे स्वरुपात उभारण्यास राज्य शासनाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला सशर्त परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील पिंपरी शहराच्या पाण्यातील पोषक द्रव्य पाण्यात मिसळली जात असल्याने पवना नदी पात्रात जलपर्णीची वाढ मोठ्या प्रमाणात होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शास्त्रोक्त पद्धतीने जलपर्णीचा प्रश्न हाताळणे आवश्यक असतानाही पर्यावरण विभाग आणि महानगरपालिका याकडे दुर्लक्ष करीत असल्याने सर्वत्र जलपर्णीची वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या जलपर्णीमुळे पूर्ण नदीपात्राचा प्रवाह खुंडतो, हवेतील ऑक्सिजन पाण्यात मिसळण्याची प्रक्रिया मंदावते यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढतो व लोकांना प्रदूषणाचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पवना नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर आणि कंपनीतून सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) शहरातील औद्योगिक वसाहतींमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी विशेष उद्देश वाहनाद्वारे MIDC व MCCIA यांचे माध्यमातून, Common Effluent Treatment Plant (CETP) उभारणे बाबतची प्रक्रिया चालू आहे. त्याचबरोबर शहरामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यापैकी सुमारे ८०% सांडपाण्यावर मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रात प्रक्रिया केली जात आहे. केंद्र शासनाच्या ‘अमृत’ योजनेअंतर्गत ड्रेनेज नेटवर्क व नवीन मैलाशुध्दीकरण प्रकल्प बांधण्याचे काम सुरू असून दोन वर्षीत १०० % सांडपाण्यावर प्रक्रिया करणेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खर्डे (ता.देवळा, जि.नाशिक) येथील अतिदुर्गम भागातील सटाणा-हनुमंतपाडा मुक्कामी बससेवा कार्यान्वित करण्याबाबत

**(१२) ६३०९७ (२५-०४-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डे (ता.देवळा, जि.नाशिक) येथील अतिदुर्गम भागात पूर्वी सुरू असलेली सटाणा-हनुमंतपाडा मुक्कामी बससेवा पूर्ववत सुरु करावी अशी मागणी खर्डेसह वाजगाव, बाशी, हनुमंतपाडा येथील नागरिकांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिदुर्गम भागातील बसफेऱ्या मागील तीन-चार वर्षांपासून बंद असल्याने प्रवासाकरीता इतर पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील विद्यार्थ्यांसह नागरिकांची गैरसोय दूर होण्यासाठी हनुमंतपाडा मुक्कामी बससेवा पूर्ववत सुरू करावी अशी मागणी आगार व्यवस्थापनाकडे सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार हनुमंतपाडा मुक्कामी बससेवा पूर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०२-२०२४) :** (१) होय.

(२) मार्च २०२० पासून कोरोनाचा प्रादुर्भाव व ऑक्टोबर २०२१ ते एप्रिल २०२३ या कालावधीतील रा.प.कर्मचा-यांच्या संपामुळे वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे सदरची फेरी आवश्यक्ता व मागणी अभावी तात्पुरती स्थगित केली होती.

(३), (४) व (५) होय.

दि.०१.०३.२०२३ पासुन सदर सटाणा-हनुमंतपाडा मुक्कामी बससेवा पुर्ववत सुरु करण्यात आली आहे.

---

## चाकूर (जि.लातूर) येथील मुख्य बसस्थानकातील प्रवाशांसाठी सोई-सुविधा व सुरक्षा पुरविण्याबाबत

**(१३) ६४६२१ (३१-०८-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) येथे मुख्य बसस्थानक असून प्रवाशांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न प्राप्त होत असून एस.टी.महामंडळ प्रवाशांच्या सोई-सुविधा तसेच सुरक्षेसह अनेक प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी प्रवाशांसाठी पिण्याची पाण्याची गैरसोय आणि स्वच्छतागृहांची दूरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी प्रवाशांना आवश्यक सोई-सुविधा तसेच योग्य ती सुरक्षा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) व (२) नाही.

चाकूर बसस्थानकात प्रवाशांकरिता पिण्याच्या पाण्यासाठी पाणपोई उपलब्ध आहेत. तसेच सद्यस्थितीतील बसस्थान

स्वच्छतागृहाची डागडुजी व रंगकाम सुरु करण्यात आले आहे. बसस्थानकावर नगरपंचायत चाकूर यांचेमार्फत नवीन स्वच्छतागृहाचे बांधकाम सुरु आहे
(३) व (४) चाकूर बसस्थानक येथे वाहतूक नियंत्रण कक्ष कार्यरत असून दोन वाहतूक नियंत्रक नेमण्यात आलेले आहेत. त्यांचेमार्फत विद्यार्थी व इतर पास वितरीत केले जातात कंत्राटी तत्वावरील स्वच्छक यांचेमार्फत चाकूर बसस्थानकाची दैनंदिन स्वच्छता केली जाते. चाकूर बसस्थानकामध्ये प्रवाशांसाठी उपहारगृह, पुस्तक दुकान, फळ दुकान, पेपर स्टॉल, बेकरी दुकान, केस कर्तनालय इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

बसस्थानकात प्रवाशांना सुरक्षतेसाठी सी.सी. टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. चाकूर बसस्थानक येथे सुरक्षा रक्षकाची नियुक्ती नसल्यामुळे सुरक्षा व दक्षता शाखेमार्फत रात्रमुक्कामी कामगिरी दरम्यान चाकूर बसस्थानकात सुरक्षेच्या दृष्टीने दक्षता फे-या घेतल्या जातात. तसेच मार्गतपासणी करताना चाकूर बसस्थानकावर दक्षता फेरी घेऊन प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आढावा घेतला जातो.

---

**माथेरान गिरिस्थान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे पर्यटकांच्या सुविधेसाठी पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१४) ६४६७७ (२८-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान गिरिस्थान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे पर्यटकांच्या सुविधेसाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेली पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुविधा कायमस्वरुपी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण संवेदनशिल असलेल्या माथेरान गिरिस्थानावर पर्यटकांच्या सेवेसाठी सुरू असलेल्या ई-रिक्षा प्रकल्पाला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यामुळे पर्यटकांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असून पर्यटनालाही चालना मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यटकांच्या सुविधेसाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरु असलेली ई-रिक्षा सुविधा कायमस्वरुपी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२४) :** (१) माथेरान येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सुविधेसाठी प्रायोगिक तत्वावर सुरु असलेली पर्यावरणपुरक ई-रिक्षा कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्याच्या मागणीसंदर्भातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) हे खरे आहे
(३) माथेरान नगरपरिषद क्षेत्रामध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुविधेसाठी प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली पर्यावरणपुरक ई-रिक्षा सर्व ऋतुमध्ये योग्य प्रकारे चालू शकते का हे पाहण्यासाठी पुढील काही कालावधीकरीता प्रायोगिक तत्वावर सुरु ठेवण्याचे माथेरान संनियंत्रण समितीने ठरविले असून त्याप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर केला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील भांडेवाडी येथे टाकण्यात येत असलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याबाबत**

**(१५) ६४७९३ (२५-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा),**

**ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने गत दोन वर्षात भांडेवाडी येथील डम्पिंग ग्राऊंडमध्ये तब्बल ३.८१ लाख मेट्रिक टन कचरा टाकला असून, सदर कचरा उचलणाऱ्या कंपन्यांना सुमारे २२९ कोटी रुपये अदा केले असल्याची बाब दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी साठवण करण्यात आलेल्या कचऱ्यामुळे परिसरातील पाणी, हवा दुषित झाली असून तुळशीनगर, अब्बूमियानगर, अंतूजीनगर, संघर्षनगर येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी व कचऱ्यापासून खतनिर्मिती, कागद, प्लास्टिकचे रिसायकलींग, उर्जा निर्मिती, इंधनवायु इ. प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२४) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेने गत दोन वर्षांत (सन २०२१-२०२२ व २०२२ - २०२३) शहरातील घराघरातुन कचरा संकलित करुन भांडेवाडी डम्पींग यार्ड मध्ये ९.०८ लाख मेट्रिक टन कचरा टाकला असुन या कामाकरीता सन २०२१-२०२२ व २०२२- २०२३ या वर्षामध्ये दोन्ही एजेन्सीला रुपये १५६.९० कोटी अदा केलेले आहे.

(२) यास्वरुपाच्या तक्रारीचे प्रमाण वाढले आहे.

(३) कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १०००+२०% टन प्रतिदिन क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र (१५+१५) ३० वर्षांकरिता डिझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे आणि देखभाल दुरुस्ती करणे करीता निविदा प्रक्रियेद्वारे निवड करण्यात आलेल्या कंपनी M/s SusBDe Holding B.V. (JV) यांचेशी नागपूर महानगरपालिकेद्वारे दिनांक १३.०४.२०२३ रोजी करारनामा करण्यात आला असून प्रकल्प उभारणीकरीता कंपनीला १८ महिने कालावधी देण्यात आलेला आहे.

सदर कंपनीला दिनांक ३०.०६.२०२३ रोजी मौजा-भांडेवाडी येथील २३.६२ एकर जागा प्रकल्प उभारणीकरीता आणि ९ एकर जागा दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता देण्यात आलेली असून लायसंस करारनामा करण्यात आलेला आहे.

तसेच निरि या तज्ञ संस्थेकडून याबाबतचा अहवाल दि.१६.११.२०२३ रोजी प्राप्त करुन घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसला लागत असलेल्या आगीच्या घटना रोखण्याबाबत

**(१६) ६४७९४ (३१-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर – भंडारा महामार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एका शिवशाही बसला आग लागल्याची दुर्घटना दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू दुर्घटनेपूर्वी दिनांक ४ एप्रिल, २०२३ रोजी नागपूर – अमरावती महामार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसला आग लागल्याची दुर्घटना घडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही दुर्घटनांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसला वारंवार लागत असलेल्या आगीच्या घटनांना प्रतिबंध घालण्याकरिता तसेच प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२४) :** (१) व (२) होय.
(३) व (४) चौकशीमध्ये तांत्रिक दोषांमुळे व रा.प.कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदर वाहनांना आग लागल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत संबधीत कर्मचाऱ्यांवर खात्यामार्फत कारवाई करण्यात आलेली आहे. राप वाहनांना लागणाऱ्या आगीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी वेळोवेळी विशेष तपासणी, देखभाल व दुरूस्ती मोहिम राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे व यापुढेही वेळोवेळी कार्यवाही करण्याबाबत नियोजन केलेले आहे.

---

**नाशिक शहरातील मायलॉन सर्कल मुंबई नाका येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे संयुक्त पुतळे बसविण्याबाबत**

**(१७) ६४८६२ (२२-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील मायलॉन सर्कल मुंबई नाका येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे संयुक्त पुतळे बसविण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या महासभेवर दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी ठराव घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुतळे बसविण्यासाठी सर्व विभागांची 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त झालेली असल्याने नाशिक महानगरपालिकेकडून या कामाला विलंब न करता लवकरात लवकर हे काम सुरु करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी आयुक्त नाशिक महानगरपालिका यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहरातील मायलॉन सर्कल मुंबई नाका येथे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे संयुक्त पुतळे बसविण्याचे काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२४) :** (१) होय , हे खरे आहे.
(२) होय,
सदर पुतळा बसविण्यासाठी नाशिक शहर पोलीस वाहतुक विभागाचा ना हरकत दाखला दिनांक ०४/०२/२०२३ रोजी तसेच कलासंचनालय महाराष्ट्र राज्य यांची पुतळयाच्या प्रतिकृतीस दिनांक ०९/११/२०२३ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. तथापी पुतळयाच्या चबुत-याच्या आराखड्यास मुख्य वास्तु शास्त्र, मुंबई यांची मान्यता अद्यापपावेतो अप्राप्त आहे. वरिल प्रमाणे सर्व विभागाचे ना-हरकत दाखले प्राप्त झाल्यानंतर पुतळयाच्या मुंजरीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीकडे मनपामार्फत प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(३) सदर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे संयुक्त पुतळे तयार करण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २०.१०.२०२३ रोजी निर्गमित केला असुन पुतळयाचे क्ले-मॉडेलचे काम पुर्ण करुन त्यापुढील काम सुरु आहे. तसेच पुतळा उभारण्याकामी चबुतरा बांधणे या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ०९/११/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई व पनवेल हद्दीतील धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावाबाबत**

**(१८) ६४९०९ (२८-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम),**

**श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने धोकादायक इमारतींच्या पूनर्बांधणीसाठी रहिवाशांच्या १०० टक्के सहमती ऐवजी ५१ टक्के रहिवाशांची संमती ग्राह्य असल्याचा निर्णय जाहिर केला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच धर्तीवर सिडको प्रशासनाने नवी मुंबई व पनवेल हद्दीतील धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाने पनवेल हद्दीतील किती धोकादायक इमारतींचा पुनर्बांधणीचा प्रस्ताव तयार केला असून, सदर धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२४) :** (१), (२) व (३) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकासाठी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचा पुनर्विकास करण्यासाठी एकूण सभासदांच्या ५१%पेक्षा कमी नाही इतक्या बहुमताचा निर्णय पारित झाल्यानंतर व्यवस्थापन समितीस पुनर्विकासाबाबत कार्यवाही करता येईल. अशी तरतूद सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.४.७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने सिडको महामंडळाने ठराव क्र.१२६३८, दि.९.१२.२०२२ पारीत केला आहे.

सिडको महामंडळामार्फत नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील २८ सहकारी गृहनिर्माण संस्थांना व पनवेल महानगरपालिका हद्दीतील ०२ सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सद्यस्थितीत, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील ०२ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे व पनवेल महानगरपालिका हद्दीतील ०८ सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील सिडको प्रशासनाने समाविष्ट केलेल्या गावांना खेळाचे मैदाने व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) ६५१५६ (२८-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईची निर्मिती करताना नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको प्रशासनाने ठाणे व रायगड जिल्ह्यातील समाविष्ट केलेल्या ९५ गावांना खेळाचे मैदान व इतर सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मा.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., सीबीडी-बेलापूर यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्राधिकरणाने समाविष्ट केलेल्या उक्त जिल्ह्यामधील प्रत्येक गावातील तरूण व होतकरू क्रीडापट्टी यांना सरावाकरिता व खेळांकरिता क्रिडांगण उपलब्ध नसून सार्वजनिक उद्याने, समाजमंदिर उपलब्ध नसल्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रम राबविताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाने नवी मुंबईची निर्मिती करताना मुलभूत पायाभूत सुविधा पुरवित असताना रस्ते, गटारे, दिवाबत्ती यांच्याबरोबर प्रत्येक गावातील सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा विषयी गरजा लक्षात घेवून नियोजन करणे गरजेचे होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवी मुंबईच्या निर्मितीसाठी सिडको प्रशासनाने समाविष्ट केलेल्या प्रत्येक गावात सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रमाकरिता तातडीने मैदाने उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
नवी मुंबईतील ठाणे, पनवेल आणि उरण या ३ तालुक्यांमधील गावांचे नियोजन करताना गावाभोवताली असलेल्या १२.५% व त्याभोवती असलेल्या नोडल क्षेत्रामध्ये नियोजन निकषांच्या आधारे आवश्यक मुलभूत सुविधांचे नियोजन करण्यात आले असून क्रिडांगण व इतर सामाजिक सांस्कृतिक उपक्रमासाठी भूखंड आरेखित करण्यात आलेले आहेत.
(३) सिडको प्राधिकरणामध्ये समाविष्ट असलेल्या गावांची योजना सुरु करताना ७०% भूखंड १२.५% भुखंडासाठी समर्पित करावी व उर्वरित ३०% क्षेत्रात रस्ते सार्वजनिक सुविधा आणि सामाजिक सुविधासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(४) नवी मुंबईमधील गाव आणि त्याभोवतीचे १२.५% क्षेत्र आणि नोडल क्षेत्र पूर्णपणे सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडांगणासह आरेखित केलेले असून बहुतांशी भूखंड पूर्णपणे विकसित करुन उपलब्ध करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागातील वाहन चालकांना नवीन गणवेश आणि शिलाई भत्ता वाढवून देण्याबाबत

**(२०) ६५३२९ (३१-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वाहक, चालकांना कर्तव्यावर असतांना स्वच्छ गणवेश बंधनकारक करण्यात आला असून, स्वच्छ गणवेश परिधान न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे आदेश परिवहन महामंडळाच्या महाव्यवस्थापकाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील एसटी कर्मचारी यांना गणवेशाचे कापड आणि शिलाई भत्ता देण्याचा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळानी निर्णय घेतल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून, गणवेश शिलाईसाठी १२०० ते १६०० रुपये खर्च येतो मात्र महामंडळाने केवळ २५० रुपये प्रतिगणवेश म्हणजे ३०० रुपये शिलाई भत्ता दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, नांदेड विभागातही अनेक महिला व पुरुष कर्मचारी काम करीत या महामंडळाचा खाकी हा ड्रेसकोड असून या सर्व कर्मचाऱ्यांना वर्षातून दोन ड्रेस त्यांना महामंडळाकडूनच दिले जात होते, परंतु कोरोना महामारीच्या काळापासून अंदाजे चार वर्षापासून अद्यापही कर्मचाऱ्यांना ड्रेस देण्यात आलेले नसल्याने कर्मचाऱ्यांना सिव्हील गणवेशामध्येच काम करावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गणवेशाच्या अभावामुळे काही प्रसंगी प्रवासासाठी निघालेल्या बसची तपासणी पथकाने तपासणी केल्यांनतर, अनेकांवर कारवाईसुध्दा केली जात असल्याने परिवहन महामंडळाच्या चालक-वाहकांना त्रास सोसावा

लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रश्नोक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील वाहक चालकांना नवीन गणवेश उपलब्ध करुन देणे व शिलाई भत्ता रुपये १६०० इतका वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४) रा.प.महामंडळातील कर्मचाऱ्यांना सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षासाठी प्रति कर्मचारी ४ गणवेश संच देण्यात आले असून सदर गणवेश संचाचे डिसेंबर-२०१९ पर्यत वाटप करण्यात आले आहे. तसेच माहे एप्रिल २३ ते मे २३ या कालावधी गणवेश परिधान न केलेल्या प्रकरणी सर्व विभागामध्ये एकूण २०८ चालक व १२३ वाहक यांचेवर प्रमादीय कारवाई करण्यात आली आहे.
(५) व (६) रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांना गणवेश कापड खरेदीसाठी सक्षम प्राधिकारी यांच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून मार्च-२०२३ मध्ये निविदा प्रसारित करण्यात आली आहे. वाणिज्य निविदेतील यशस्वी निविदाकारांकडून गणवेश कापड खरेदीसाठी निविदा व भांडार समितीस खरेदी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही चालु आहे.

---

**मालेगांव शहरात (जि.नाशिक) येथे अनेक इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(२१) ६६००३ (२८-०८-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात १९२ इमारती धोकादायक असून १५ इमारती अतिधोकादायक असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळयापूर्वी या धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रहिवाश्यांची व्यवस्था करुन शहरातील धोकादायक इमारतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, जुन्या/मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसळयापुर्वी करावयाची कार्यवाही बाबत नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक दि.०५ नोव्हेंबर २०१५ नुसार मालेगाव महानगरपालिकेमार्फत संभाव्य धोकादायक इमारतींची वर्गवारी ठरविण्यात येते त्यानुसार सदर मिळकत धारकास त्या अनुषंगाने प्रभाग समिती कार्यालयामार्फत नोटीस बजवण्यात येते व उक्त परिपत्रकात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येते. पावसाळयापुर्वी धोकादायक घराबाबतच्या नागरीकांनी करावयाच्या उपाययोजनाबाबत स्थानिक वर्तमान पत्रात (मराठी व उर्दु) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ अन्वये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील मिळकतकर सवलतील जाचक अटी व शर्ती मागे घेण्याबाबत**

**(२२) ६६३२४ (१२-०९-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती),**

**श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात मा. मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सचिवालय कक्षात दाखल केलेल्या २१७ अर्जामध्ये सर्वात जास्त तक्रारी या पुणे शहरात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावातील मिळकत करासंदर्भातील असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे म.न.पा कडून सन २०१७ मध्ये ११ गावांचा व त्यांनतर २३ गावांचा समावेश करण्यात आलेल्या गावातील नागरीकांकडून नियमानुसार मिळकत कर वसूलीचे नोटीस देण्यात आले आहे, परंतु सदर कर वसूल करताना उक्त गावांमध्ये मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध होत नसल्याने मिळकत कर भरण्यास सदर गावांतील नागरीकांचा तीव्र विरोध असल्याने सदर मिळकत कर माफ करण्याबाबत नागरिकांची मागणी केली असतानाही म.न.पा., पुणे यांच्याकडून कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेने मिळकत करात ४० टक्क्यांची सवलत लागू केली आहे परंतु ही सवलत मिळण्याबाबत कागदपत्रांच्या संदर्भातील जाचक अटी व शर्ती लावण्यात आल्याने त्यांचा म.न.पा. पुणे येथील नागरीकांना लाभ होत नसल्याने नागरिकांमध्ये सदर निर्णयाबाबत असंतोष आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार मिळकत सवलतीबाबतच्या जाचक अटी व शर्ती मागे घेण्यासह उक्त ठिकाणच्या नागरीकांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०२-२०२४) :** (१) अशी बाब नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) मुख्य सभा ठराव क्र. ४२८ दि.२०.१०.२००३, तसेच महापालिका आयुक्त यांचे कडील ठराव क्र. ६/४४९, दिनांक १२.०२.२००४ नुसार प्राप्त मान्यतेस अनुसरून "ज्या सालचे घर त्या सालचा दर" या धोरणाप्रमाणे आकारणी दर निश्चित करण्यात आले होते. या सूत्रानुसार ग्रामपंचायत नोंदीनुसार जे घर ज्या सालातील असेल त्या सालातील दराने कर आकारणी करण्यात येत आहे.

पुणे मनपा हद्दीमध्ये गावे नव्याने समाविष्ट झाल्यानंतर ग्रामपंचायत नमुना नं.८ च्या आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मिळकतीची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९(अ) नुसार करपात्र रक्कमेवर मनपा सर्वसाधारण कर व इतर सेवाकर यांची एकत्रित बेरीज करून त्यातून ग्रामपंचायत कर वजा करून उर्वरित रक्कमेच्या प्रथम वर्षी २०%, द्वितीय वर्षी ४०%,तृतीय वर्षी ६०%, चतुर्थ वर्षी ८०% व पाच वर्ष पूर्ण झालेनंतर १००% वाढ करण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही केली जात आहे.

(३) अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील बारा चालकांची यवतमाळ जिल्हयात झालेल्या बदलीबाबत

**(२३) ६६५३० (३१-०८-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील बारा चालकांच्या यवतमाळ, बुलढाणा येथे झालेल्या बदल्या रद्द करुन अमरावती स्वजिल्ह्यामध्ये करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांना विनंती केली असता त्यांचे कार्यालयाचे पत्र मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, अमरावती विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्रमांक १६४/२०२३दि.१२/०५/२०२३ रोजी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, परिवहन महामंडळ वाहतूक, मुंबई यांना पत्र

पाठवून लोकप्रतिनिधी यांनी पत्रात नमूद केलेल्या मागण्या मंजूर करण्यासंबंधी व त्यासंबंधी निर्णय घेण्याबाबत कळविले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आले तसेच उपरोक्त नमूद बारा चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२४) :** (१) होय.
(२) रा.प.अमरावती विभागातील चालक पदामध्ये "विमाप्र" या जात प्रवार्गात २१ पदे मंजूर असून, ३५ कर्मचारी कार्यरत असल्याने, १४ पदे अतिरिक्त ठरत होती. अनुसूचित जमातीमधील चालक कर्मचारी यांनी विमाप्र जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे व त्यांना संरक्षण दिल्यामुळे, सदर चालक कर्मचाऱ्यांना विमाप्र या जात प्रवर्गामध्ये सामावून घेतल्याने तसेच इतर विभागातून बदली होऊन आल्यामुळे चालक पदामध्ये १४ पदे अतिरिक्त झालेले होते. त्यामुळे, सदर अतिरिक्त ठरणाऱ्या १४ चालक कर्मचाऱ्यांची रा.प.अमरावती प्रदेशांतर्गत रा.प.यवतमाळ व बुलढाणा विभागात अनुक्रमे १० व ०२ अशा १२ "विमाप्र" या जात प्रवर्गातील चालकांच्या प्रशासकीय कारणास्तव बदल्यांची कार्यवाही उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र.३ (अमरावती/नागपूर) यांच्या कार्यालयार्फत करण्यात आली.
त्यानंतर, सदर कर्मचाऱ्यांनी बदली विरोधात लोकप्रतिनिधींमार्फत तक्रार उपस्थित केल्याने, त्याची दखल घेऊन उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र.३ (अमरावती/नागपूर) यांच्या कार्यालयामार्फत पत्र दि.२२.०५.२०२३ व दि.१३.०६.२०२३ नुसार, सदर १२ कर्मचाऱ्यांना पुन्हा तात्पुरत्या स्वरुपात (ऑन लोन बेसिस) रा.प.अमरावती विभाग येथे कामगिरीकरीता नेमणूक देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरातील बसस्थानकांसह प्रशासकीय इमारतीतील कार्यालयातील महिलांसाठी "हिरकणी कक्ष" उपलब्ध करण्याबाबत

**(२४) ६६८४४ (३०-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील बसस्थानकांसह प्रशासकीय इमारतीतील बहुतांश कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील काही विभागात महिलांसाठी "हिरकणी कक्ष" उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिरकणी कक्ष नसल्यामुळे सदर कार्यालयातील महिला कर्मचारी व कामानिमित्त येणाऱ्या महिलांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय कार्यालय, बसस्थानक येथे तातडीने हिरकणी कक्ष उभारण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०२-२०२४) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) परभणी बसस्थानकाच्या पुर्न:बांधणीचे काम सुरु असल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आलेल्या बसस्थानकामध्ये तात्पुरत्या स्वरुपात हिरकणी कक्ष उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच नवीन परभणी बसस्थानकाच्या आराखड्यामध्ये हिरकणी कक्षाचा समावेश करण्यात आला असून विभागीय कार्यालय, विभागीय कार्यशाळा व परभणी, जिंतूर, हिंगोली, पाथरी, गंगाखेड, वसमत, कळमनुरी या आगारांमधील सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी महिला विश्रांतीगृहाचा वापर हिरकणी कक्ष म्हणून करण्यात येत आहे.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथे स्व.भाऊसाहेब फुंडकर नाटयगृह बांधकामास सुधारित मान्यता प्रदान करणेबाबत

**(२५) ६७१८३ (२५-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) नगरपालिका हददीत स्व.भाऊसाहेब फुंडकर नाटयगृह बांधकामास रु.८ कोटी ६९ लक्ष निधीस मान्यता प्रदान करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु या नाटयगृहाचे बांधकाम निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे वैशिष्टपुर्ण योजनेंतर्गत मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांना सुधारित मान्यता प्रदान करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या नाटयगृहाचे बांधकामासाठी रु.२ कोटी ४२ लक्ष एवढया सुधारित अंदाज पत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ अन्वये रु. ५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दि.२६ मार्च, २०१८ अन्वये रु. २.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पिय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

## रायगड जिल्हयातील पेण नगरपरिषदेतील नाटयगृहाच्या दुरूस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ६७४७३ (३१-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण नगरपरिषदेच्या नाटयगृहाच्या दुरूस्तीचे काम शासनाने निधी उपलब्ध न करून दिल्यामुळे सन २००४ पासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील सांस्कृतिक जडणघडणीचा, नामवंत नाटयसृष्टी व सिनेसृष्टी कलावंतांचा ठेवा व वारसा जपणाऱ्या या पेण शहरातील रसिक जनतेला नाटयगृहाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याकरीता मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदय यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षांपासून दुरूस्तीकरीता प्रलंबित असलेल्या या नाटयगृहास लवकरात लवकर निधी मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पेण नगरपरिषदेमार्फत उभारण्यात येत असलेल्या नाटयगृहासाठी शासनाने रु.३.५१ कोटी इतका निधी वैशिष्टपुर्ण योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांची मागणी व उपलब्ध निधी विचारात घेऊन आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडूप (मुंबई) येथील सावित्रीबाई फुले प्रसूतिगृहात नवजात बालकांचा छळ होत असल्याबाबत**

**(२७) ६७५९४ (३१-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (मुंबई) येथील सावित्रीबाई फुले प्रसूतिगृहात नवजात बालकांचा अमानुष छळ होत असल्याची धक्कादायक घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाळाच्या रडण्याचा त्रास होत असल्याने त्याच्या तोंडात चोखणी देऊन त्यावर चिकटपट्टी लावली जाते तसेच शी, शू केलेल्या बाळाचे कपडेही बदलले जात नाहीत, असे एनआयसीयूमध्ये ठेवण्यात आलेल्या श्रीमती प्रिया कांबळे यांच्या नवजात बालकाबाबत घडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत काही संस्थांनी रुग्णालय प्रशासनाला निष्काळजीपणाचा जाब विचारण्याकरीता सहायक आयुक्तांना पत्रान्वये कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन संबंधित रुग्णालयावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर घटनेबाबत दिनांक ०९.०६.२०२३ रोजी सावित्रीबाई फुले प्रसुतीगृहाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यास राजकीय पक्षाद्वारे निवेदन देण्यात आले.

(४) सदर प्रसुतीगृहामध्ये नवजात शिशु अतिदक्षता कक्ष चालविणाऱ्या मे. इंडियन पेडीयाट्रीक नेटवर्क प्रा.लि. यांचेकडून सदर तक्रारीबाबत लिखित स्पष्टीकरण मागविण्यात आले असता त्यांनी असा प्रकार घडला नसल्याचे स्पष्ट केले.

तसेच, सदर प्रकाराबाबत वरिष्ठ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी तक्रारीच्या वेळेचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, सुस्पष्टपणे बाळाच्या तोंडात चोखणी दिल्याचे किंवा तोंडाला चिकटपट्टी लावली असल्याचे आढळून आले नाही. सदर प्रकार रुग्ण व परिचारीका यांच्यातील विसंवाद व गैरसमजुतीतून झाला असल्याचे सांगण्यात आले.

सदर प्रकारानंतर भविष्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याबाबत संबंधित संस्थाचालकांना समज देण्यात आली आहे व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी अतिदक्षता कक्षाच्या कामगिरीवर नियमितपणे पर्यवेक्षण करीत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एसटी कर्मचारी वेतनाविना असल्याबाबत**

**(२८) ६८५३६ (३०-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळातील एसटी कर्मचाऱ्यांना दर महिन्यांच्या ७ ते १० तारखेदरम्यान वेतन देण्याची जबाबदारी राज्यशासनाची असतांना एसटीचे ९० हजार कर्मचारी अद्याप वेतनाविना असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून वेतनासह सवलतीचे मूल्य वेळेत न मिळाल्याने एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निधीची तरतूद करुन सदरील वेतन व सवलत मूल्य एसटी महामंडळाला तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२४) :** (१) व (२) नाही.

शासनाकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचा-यांचे वेतनासह सवलतीचे मुल्य दरमहा नियमित अदा करण्यात येत असून, माहे मार्च-२०२३ चे वेतन दि.१० एप्रिल २०२३ रोजी अदा करण्यात आलेले आहे. तसेच माहे एप्रिल-२०२३ चे वेतन दि.०९ मे २०२३ रोजी अदा करण्यात आलेले आहे.
(३) व (४) शासन निर्णय दि.१०.०४.२०२३ नुसार राज्य शासनामार्फत उत्पन्न व खर्चातील तुट भरून काढण्यासाठी माहे मार्च-२०२४ पर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

---

## बीड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांनी शासनाने शिष्यवृत्तीचा निधी पाठवून सुध्दा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अद्यापही दिली नसल्याबाबत

**(२९) ६८५५९ (१२-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, केंद्र शासनाची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या पाल्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांनी शासनाने शिष्यवृत्तीचा निधी पाठवूनसूध्दा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अद्यापही दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांनी सन २०२१-२२ मध्ये जिल्ह्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या किती आहे व अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या पाल्यांची संख्या किती आहे, याची यादी शिक्षण विभागाकडून घेतली नसल्याचे छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथील समाजकल्याण उपायुक्त कार्यालयामध्ये सन २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या आढावा बैठकीत निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समाज कल्याण अधिकारी, जि.प.बीड यांच्या चुकीमुळे जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागल्यामुळे तेथील लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी, श्री. रविंद्र शिंदे यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ व सन २०२२-२३ ची शिष्यवृत्ती त्वरीत देण्याबाबत दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री व सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे,
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे,
(४) हे खरे आहे.
(५) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, औरंगाबाद यांचे पत्र क्र.९९२, दि.१८.०३.२०२३ अन्वये शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केले आहे. त्यानुसार आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी त्यांच्या दि.१५.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्री. आर.एम. शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याची कार्यवाई सुरु आहे.

---

**नाशिक महानगरपालिका हद्दीतील सातपुर शिवाजीनगर परिसरातील बांधकाम मजुराचा झालेला मृत्यु**

**(३०) ६८८३४ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका हद्दीतील सातपुर शिवाजीनगर परिसरातील सहज स्कुल ॲड ज्युनिअर कॉलेजच्या इमारत बांधकाम प्रकल्पावर काम करत असलेल्या बांधकाम मजुराचा इमारतीचे काम करत असतांना छतावरुन पडून मृत्यु झाल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची घटना ही बांधकाम व्यावसायिकाने सुरक्षाविषयक उपाययोजना न केल्याने घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देतांना सुरक्षा विषयक उपाययोजना संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडून दिल्या जातात किंवा नाही याची खातरजमा केली नसल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरात सुरक्षा विषयक उपाययोजना न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर तसेच संबंधित बांधकाम प्रकल्पाने महाराष्ट्र कामगार सुरक्षा कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

सदर भूखंडामध्ये ३०% बांधकाम विकसनाचे काम पुर्ण झालेले असून भूखंडाच्या हद्दित संरक्षणासाठी वॉचमन,CCTV कॅमेरा व भूखंडास पत्र्याचे संरक्षक भिंत व प्रवेशाव्दार बांधलेले आहे.

(३) नाही,

मनपा नगर रचना विभागाकडून इमारत बांधकाम परवानगी प्रस्तावाची नियमानुसार छाननी करुन इमारत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ च्या तरतुदीस अधिन राहुन दिले जाते. तसेच या प्रमाणपत्राचे आधारे इमारत बांधकाम करतांना संबंधित विकासकास काही अटी व शर्तींना अधीन राहुनच निर्माण कार्य पूर्ण बंधनकारक असते. या अटींपैकी अट क्र. १५ व २१ या विकासकाने कराव्या लागणाऱ्या सुरक्षा विषयक उपाययोजना व त्याअनुषंगाने घ्यावी लागणारी खबरदारी यासबंधित आहेत. त्याचे उल्लंघन झाल्यास होणाऱ्या परिणामांची सुरक्षा जबाबदारी संबंधित विकासकांची असते.

(४) मनपाने दि.०६/०६/२०२३ अन्वये नोटीस देऊन इमारत बांधकाम परवानगी रद्द का करु नये? याबाबत खुलासा संबंधित विकासकाकडून मागविण्यात आलेला आहे.

सदर नोटीसीवर विकासक यांनी खुलासा पत्र सादर केलेले असुन त्यांनी बांधकाम केल्यावर सुरक्षात्मक व प्रतिकात्मक उपायोजना केल्याचे नमूद केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा थ्रुटा (ता.कोरपना, जि.गडचिरोली) येथील जागा गंडचादूर कोरपना येथील बसस्थानकाकरिता मंजूर करण्याबाबत**

**(३१) ६८८५१ (३१-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा थ्रुटा (ता. कोरपना, जि.गडचिरोली) येथील स.न. २६४/१ आराजी ५.१३ हे. आर पैकी १.२० हे. आर ही जागा गंडचादूर कोरपना येथील बसस्थानकाकरिता मंजूर करण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जिल्हाधिकारी यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचांदूर व कोरपना (जि.चंद्रपूर) येथे बसस्थानकरिता जागा उपलब्ध करुन देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जिल्हाधिकारी यांना दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू ठिकाणी बसस्थानकाकरिता जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) निवेदनाची प्रत मध्यवर्ती कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळुन येत नाही.
(३) व (४) मौजा थुटरा, गडचांदुर ता.कोरपना येथील अंबुजा सिमेंट कंपनीची सर्व्हे क्र.२६४/०१ आराजी ५.१३ हेक्टर आर पैकी १.२० हेक्टर आर जागा गडचांदुर बसस्थानकासाठी देण्याच्या अनुषंगाने "शासन परिपत्रक क्र.जमिन-०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१,दि.३०-११-२०१२ मधील ०२ (२) नुसार सदर जागा महामंडळाच्या ताब्यात देण्यापूर्वी प्रचलित बाजार मुल्यानुसार संपुर्ण किंमत आकारण्यात यावी असे निर्देशा प्रमाणे सदर जागेचे प्रचलित बाजार मूल्य रु.२४,००,०० सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दि.२०.१२.२०१८ रोजी कळविले आहे.
सदर जागेच्या खरेदीकरिता लागणारा निधी खनिज निधीमधुन उपलब्ध करुन देण्याबाबत रा.प. महामंडळाच्या चंद्रपूर विभागाकडुन जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेशी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## मुंबई शहरातील विविध महानगरपालिका रुग्णालयांतील कचरा व्यवस्थापनासाठी भूमिगत कचरापेट्यांचा वापर करण्याच्या निर्णयाबाबत

**(३२) ६८८५७ (२४-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील विविध महानगरपालिका रुग्णालयांतील कचरा व्यवस्थापनासाठी भूमिगत कचरापेट्यांचा वापर करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, शहरातील विविध महानगरपालिका रुग्णालयात कचरापेट्या बसविण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे काय आणि अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) आधुनिक भूमिगत स्वरुपाच्या कचरा डब्यामुळे कचऱ्याचा येणारा वास, मोकाट जनावरे व कचरा वेचकांकडून पसरविण्यात येणाऱ्या कचऱ्यावर नियंत्रण येऊन रुग्णालय परिसर स्वच्छ राहील व परिसरातील एकूणच आरोग्य राखले जाईल.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालय परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राखण्याकरिता शहर विभागातील ५ रुग्णालयांमध्ये एकूण १५ आधुनिक भूमिगत स्वरुपाचे कचरा डबे बसविण्याकरिता दिनांक १९.०७.२०२३ रोजी प्राप्त होतील अशा रितीने निविदा मागविण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सदर निविदेचे मसुदापत्र प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे.

सदर भूमिगत कचरा पेट्यांच्या उभारणीचा व कार्यान्वित करण्याकरिता रु. १.८८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चामध्ये एक वर्षाच्या हमी कालावधीनंतरच्या दोन वर्षांचा सर्वसमावेशक देखभालीचा एकूण खर्च रु. ०.१६ कोटी इतका अंतर्भूत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील तसेच खाजगी मंडयांची झालेली दुरवस्था**

**(३३) ६९०३३ (३१-०८-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील तसेच खाजगी मंडयांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडयांच्या दुरवस्थेमुळे मंडईतील विक्रेत्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने त्यांचा पुनर्विकास महानगरपालिकेने करावा अशी मागणी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मंड्यांच्या तसेच समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या खाजगी मंड्यांच्या इमारतींचे नियमित संरचनात्मक परिक्षण करण्यात येऊन, आवश्यकतेनुसार व्यापक व किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

तसेच जीर्ण झालेल्या मंड्यांचा पुनर्विकास करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(२) जीर्ण झालेल्या मंड्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाशी समन्वय साधून पुनर्विकासाचा प्रस्ताव आराखडा इमारत बांधकाम विभागाकडे प्राप्त होतो. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निविदा काढून मंडईच्या पुनर्विकासाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत बांधकाम विभागामार्फत करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्पाबाबत**

**(३४) ६९०८४ (३१-०८-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगराची पाण्याची वाढती गरज लक्षात घेता तसेच प्रसंगी पावसाळ्याच्या विलंबामुळे निर्माण होणाऱ्या पिण्याच्या पाणी समस्येवर मात करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने निःक्षारीकरण प्रकल्प अर्थात समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प उभारण्याचे धोरण राबविण्याचा निर्णय सन २०२१ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प राबविण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून सदरहू प्रकल्पाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्रुषंगाने समुद्राच्या

खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प तात्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, त्याअनुषंगाने निविदेची प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
सदर प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लवकरात लवकर निविदा मागविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून 'सर्वांसाठी पाणी' हे धोरण राबविण्याचा घेतलेला निर्णय

**(३५) ६९०८६ (०३-०९-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रत्येक नागरिकाला पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तत्कालीन शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून दिनांक १ मे, २०२२ पासून 'सर्वांसाठी पाणी' धोरण राबविण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धोरण राबविण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) दिनांक १ मे, २०२२ पासून "सर्वांसाठी पाणी" हे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंमलात आणण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) "सर्वांसाठी पाणी" या धोरणांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी जलजोडणी देण्यात येत असून, आजपर्यंत जलजोडणीसाठी एकूण ८७९३ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी कागदपत्रांची पूर्तता झालेल्या एकूण ७७१४ अर्जदारांना परवानगीपत्र देण्यात आले आहे. परवानगीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या सुमारे ३३०० अर्जदारांना जलजोडणी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर विमानतळाच्या प्रलंबित कामाबाबत

**(३६) ६९२०९ (३१-०८-२०२३). श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वातंत्र्यपूर्व काळात छत्रपती राजाराम महाराजानी जानेवारी १९३९ साली कोल्हापूर विमानतळाची सुरूवात केली होती, परंतु ८५ वर्षापूर्वी आकाराला आलेल्या या विमानतळावरून अजूनही आंतरराष्ट्रीय वाहतूक सुरू होऊ शकलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर राज्यात विशेषत: सोलापूर, सिंधुदुर्ग येथे विमानतळ सुरु आहे, माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्याने शासनाने रत्नागिरी विमानतळाच्या विकासासाठी २० हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तथापि, वाढीव जमीन हस्तांतराचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने कोल्हापूरातून आंतरराष्ट्रीय विमानतळ वाहतूक सुरु होवू शकलेली नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांपेक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्हयांचा विकासांचा वेग जास्त आहे त्यामुळे आज १२ हजार फूट लांबीची धावपट्टी हवी होती, पण अजूनही ७ हजार ६०० फूटावर स्थिरावली असल्याने ४००-५०० टन वजनाची आंतरराष्ट्रीय विमाने उतरण्याच्या क्षमतेची ही धावपट्टी नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोल्हापूर विमानतळावरुन आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक विनाविलंब सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२४) :** (१) कोल्हापूर विमानतळ हे उडे देश का आम नागरिक योजनेंतर्गत (RCS) कार्यान्वित असून आंतरदेशीय विमानसेवा पूरवत आहे.
(२) सोलापूर (होटगी) विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली असून या विमानतळावरून उडे देश का आम नागरिक योजनेंतर्गत (RCS) कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
सिंधुदुर्ग विमानतळ हे उडे देश का आम नागरिक योजनेंतर्गत (RCS) कार्यान्वित आहे.
रत्नागिरी विमानतळासाठी २७.९९.५९ हे.आर.चौ.मी.जमीन राज्य शासनाकडून संपादीत करण्यात आलेली असून या विमानतळावरून उडे देश का आम नागरिक योजनेंतर्गत (RCS) कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) हे खरे नाही.
कोल्हापूर विमानतळ हे आंतरराष्ट्रीय विमानतळ नसून आंतरदेशीय म्हणून कार्यान्वित आहे. कोल्हापूर विमानतळास नागर विमानन मंत्रालयाचा आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यासाठी आवश्यक असणारा परवाना नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू नाही. तथापि आंतरदेशीय विमानसेवा सुरू करण्याचा परवाना आहे.
(४) कोल्हापूर विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिपत्त्याखाली असून त्याचा विकास त्यांच्या मार्फत करण्यात येत आहे. या विमानतळाची धावपट्टी आजमितीस १३७० मीटर (४४९७ फुट) लांबी असून, या धावपट्टीचा विस्तार २३०० मीटर(४२६५ फुट) पर्यंत करण्याची कार्यवाही त्यांचेकडून सुरू आहे.
कोल्हापूर विमानतळाची सद्य:स्थितीमध्ये धावपट्टी BITUMINOUS असून या धावपट्टीची क्षमता २६/F/B/Y/T अशी आहे. या धावपट्टीच्या क्षमतेस अनुसरून नागरी उड्डाणे विमानतळावरून हाताळू शकतात.
(५) कोल्हापूर विमानतळ हे भारतीय विमानपत्तन यांच्या अधिनस्त असून ते आंतरराष्ट्रीय विमानतळ नसून आंतरदेशीय म्हणून कार्यान्वित आहे. कोल्हापूर विमानतळास नागर विमानन मंत्रालयाचा आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यासाठी आवश्यक असणारा परवाना नाही. तथापि आंतरदेशीय विमानसेवा सुरू करण्याचा परवाना आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील महानगरपालिकेच्या रुग्णालयातील खासगी अतिदक्षता विभागातील त्रृटीबाबत

**(३७) ६९५६५ (०४-०९-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम),**

**डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयातील अतिदक्षता विभागामध्ये खाटांची पुरेशी उपलब्धता नसल्याच्या तक्रारी सोडविण्यासाठी या विभागाचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र तेथे तज्ञांचा अभाव, तीन शिफ्टमध्ये एकाच वेळेत डॉक्टर, रुग्णसेवेत चालढकलपणा इत्यादी त्रूटी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील अतिदक्षता विभागातील त्रूटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम., सायन, नायर, कूपर तसेच उपनगरीय रुग्णालये व कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अखत्यारीतील रुग्णालयांच्या वैद्यकीय अतिदक्षता, शल्यचिकित्सा, ट्रॉमा अतिदक्षता, नवजात शिशू अतिदक्षता, ह्रदयरोग अतिदक्षता, न्युरोलॉजी इत्यादी अतिदक्षता विभागात एकूण ९७७ रुग्णशय्या आहेत.
के.ई.एम., सायन, नायर, कूपर या वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न असलेल्या प्रमुख रुग्णालयातील व कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अखत्यारीत येणाऱ्या कस्तुरबा रुग्णालयाच्या विविध विभागांच्या अतिदक्षता विभागातील सर्व सेवा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येतात.
तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय, शल्यचिकित्सा, ट्रॉमा, नवजात शिशु इत्यादी अतिदक्षता विभागात एकूण २७२ रुग्णशय्या आहेत. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परिचारीका व चतुर्थ श्रेणी संवर्ग तसेच यंत्रे व सयंत्रे उपलब्ध आहेत. तथापि वैद्यकीय व शल्यचिकित्सा विभागातील १६५ रुग्णशय्येसाठी तज्ञ डॉक्टरांची नियमित उपलब्धता होत नसल्याने संपूर्णत: खाजगीकरण न करता बहिर्स्रोतीकरणाद्वारे केवळ तज्ञ इन्टेन्सिव्हिस्ट डॉक्टरांच्या सेवा घेण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.
(२) श्रीमती म. तु. अगरवाल रुग्णालय, (मुलुंड), भगवती रुग्णालय (बोरीवली) व देसाई रुग्णालय (मालाड) या रुग्णलयांतील अतिदक्षता विभागात पुरविण्यात आलेल्या इन्टेन्सिव्हिस्ट डॉक्टरांकडून देण्यात आलेल्या वैद्यकीय सेवांविषयी मोठ्या प्रमाणात अटी व शर्तींचा भंग झाल्याचे आढळून आले.
(३) सदर ठिकाणी इन्टेन्सिव्हिस्टची सेवा पुरविणाऱ्या सेवा पुरवठादारामार्फत निविदेतील अटी व शर्तींनुसार तज्ञ डॉक्टरांनी तिन्ही सत्रांत वैद्यकीय सेवा देणे अपेक्षित आहे. तथापि काही अतिदक्षता विभागात त्रुटी आढळल्यास सेवा पुरवठादारास कारणे दाखवा नोटीस व दरमहा देयकाच्या रकमेतून दंडात्मक वसुली करण्यात येते.
तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांपैकी श्रीमती म.तु. अगरवाल रुग्णालय (मुलुंड), भगवती रुग्णालय (बोरीवली), मनोहर वामन देसाई रुग्णालय (मालाड) या रुग्णालयातील अतिदक्षता विभागात पुरविण्यात आलेल्या इन्टेन्सिव्हिस्ट डॉक्टरांकडून देण्यात आलेल्या वैद्यकीय सेवांविषयी मोठ्या प्रमाणात अटी व शर्तींचा भंग झाल्याने याठिकाणी इन्टेन्सिव्हिस्ट पुरवठा करणाऱ्या सेवा पुरवठादाराचे कंत्राट रद्द करण्यात आले असून, सदर कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील अंधेरी पुर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पूलावरील वाहतूक सुरु करण्याबाबत

**(३८) ६९८८२ (१२-०९-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पुर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पूल धोकादायक झाल्याने सदर पूलाचे काम करण्याकरिता दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाच्या दोन लेन माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात येईल असे मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत आश्वासन देण्यात आले होते, मात्र रेल्वे हद्दीतील खोदकाम विविध परवानगी यामुळे विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूलाचे किती काम पूर्ण झाले असून या पूलाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) महानगरपालिका व रेल्वे प्रशासन, सर्व संबंधित यंत्रणाशी योग्य समन्वय राखून वेगाने या प्रकल्पाचे काम पूर्ण व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न केला जात असला तरीही अद्यापी काही कामे शिल्लक आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने सदर पूलावरील वाहतुक पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) अंधेरी पूर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पुलाचे रेल्वे हद्दीतील निष्कासनाचे काम पश्चिम रेल्वे प्राधिकरणामार्फत दिनांक २८ मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रेल्वे हद्दीतील काम, रेल्वे अधिकृत सल्लागार मे. राईट्स लि. यांच्या पर्यवेक्षणाखाली सुरु करण्यात आले.

सद्य:स्थितीत गोखले पुलाचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील पहिल्या टप्प्यातील उतार मार्गाचे काम ९०% पूर्ण झाले असून, रेल्वे हद्दीतील दोन्ही बाजूच्या पाया व खांबांचे काम पूर्ण होत आहे. तसेच, तात्पुरती ट्रसल उभारण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण झाले आहे. तथापि, रेल्वे क्षेत्रातील तात्पुरती ट्रसल उभारण्याचे काम पश्चिम रेल्वेच्या सहकार्याने आवश्यक ट्राफिक व पॉवर ब्लॉक मिळाल्यानंतरच करणे शक्य होणार आहे. त्याकरिता पश्चिम रेल्वेसोबत संपर्क व पाठपुरावा करुन विहित वेळेत सदर काम पूर्ण करुन घेण्यात येणार आहे.

तसेच, रेल्वे हद्दीतील पहिल्या टप्प्यातील मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या ११८८ मेट्रीक इतके लोखंड मे. जिंदाल स्टील कंपनी, अंगुल, ओरीसा व स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया, ओरिसा यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर सदर पुलाच्या पहिल्या मार्गिकेच्या ओपन वेब गर्डरचे निर्माण मे. एच एम एम इन्फ्रा., अंबाला, हरियाणा यांच्याकडून पूर्ण होऊन ते गोखले पुलाच्या कामाच्या ठिकाणी परिवहन करुन तात्पुरत्या ट्रसल्सवर जोडण्याचे काम सुरु आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर रेल्वे प्राधिकरणामार्फत ब्लॉक मिळाल्यानंतर ओपन वेब गर्डर रेल्वे हद्दीतील जागेवर ठेवण्याचे काम रेल्वे प्राधिकरणाच्या मदतीने करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकेसाठी आवश्यक असलेले ११८८ मेट्रीक इतके लोखंड मे. एच एम एम इन्फ्रा., अंबाला, हरियाणा येथे आले असून, ओपन वेब गर्डरच्या निर्माणाचे काम सुरु आहे.

तसेच, गोखले पुलाच्या पहिल्या टप्प्यातील मार्गिकेचे काम माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार, पहिल्या मार्गिकेचे बांधकाम करण्याचे नियोजन करण्यात आले असून, पश्चिम रेल्वेच्या समन्वयाने सदर काम प्राधान्याने करण्यात येत आहे.

---

## जत (जि.सांगली) एस.टी आगारातील कामगारांचे प्रश्न सोडविण्याबाबत

**(३९) ७००२७ (३१-०८-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) एसटी आगारातील कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी एस.टी कामगार संघटनेच्या वतीने एकदिवशीय आंदोलन केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त एसटी आगारातील कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२४) :** (१) व (२) होय.

दि.१५.०२.२०२३ रोजी एस.टी कष्टकरी जनसंघ या अमान्यता प्राप्त संघटनेच्या १० ते १५ कर्मचाऱ्यांनी काळया फीती लावून आंदोलन केले होते.

एस.टी.कष्टकरी जनसंघ ही श्रमिक संघटना रा.प.महामंडळात नोंदणीकृत परंतू अमान्यताप्राप्त श्रमिक संघटना म्हणून कार्यरत आहे. सदरहू संघटनेने दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने आगार व्यवस्थापक, रा.प.जत आगार यांनी कर्मचाऱ्यांशी तोंडी चर्चा केली असून पत्रातील मुद्यांबाबत नियमाधीन कार्यवाही करण्याच्या वाहतूक/यांत्रिक पर्यवेक्षकांना योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पश्चिम उपनगरातील गोराई येथील विकासक खंडेलवाल यांनी अनधिकृत जलवाहिनी टाकल्याबाबत

**(४०) ७०४५३ (३१-०८-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील गोराई डेपोच्या मागील बाजूला विकासक खंडेलवाल यांनी विकसित केलेल्या इमारतीसाठी अनधिकृत जलवाहिनी टाकण्याच्या कामाला कोणतीही परवानगी न घेता तसेच मुंबई महानगरपालिकेच्या आर मध्य विभागातील अधिकारी व कर्मचारी काम करत असल्याचे माजी नगरसेविका श्रीमती श्वेता कोरगांवकर यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी हे काम दिनांक १८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास थांबविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जल विभागातील कार्यकारी अधिकारी तसेच अन्य संबंधीत अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता, त्या सर्व अधिकारी वर्गाकडे रस्ते विभाग, जलखाते, वाहतूक विभाग यापैकी कोणात्याही विभागाची परवानगी नसल्यामुळे आक्रमक झालेल्या श्री.कोरगांवकर यांनी सदर नळजोडणी बंद पाडली असून या बेकायदा नळ जोडणी देणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य संबंधीत अधिकाऱ्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणासंदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) सदर घटना दिनांक २३.०२.२०२३ रोजी घडली आहे.

गोराई डेपोच्या मागील बाजूस असलेल्या विकासक खंडेलवाल यांच्या निर्माणधीन इमारतीसाठी दिनांक २९.०६.२०२२ रोजी कामगारांना पाणी पिण्यासाठीच्या १५ मिमी. x १५ मिमी. व्यासाच्या जलमापक विरहित दोन जलजोडण्या मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ९२ व जलआकार नियमावली २.७ अन्वये देण्यात आल्या आहेत.

तथापि दिनांक २३.०२.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागामार्फत दुरुस्तीचे काम सुरु असलेल्या खड्डयामध्ये दोन प्लशिंग पॉईंट काढण्यात आले होते. परंतु तेथील स्थानिक रहिवाशी व माजी नगरसेविका यांच्या विरोधामुळे सदर प्लशिंग पॉईंट मुख्य जलवाहिनीवर बंद करण्यात आले.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, त्याअनुषंगाने संबंधित दुय्यम अभियंता यांच्या खुलाशानुसार सदर ठिकाणी असलेले जलवितरणाचे जाळे विस्तृत असल्याकारणाने उपलब्ध असलेले फायर हायड्रंट प्लशिंग करण्याच्या तसेच एअर ट्रॅप काढण्याच्या उद्देशाने अपुरे असल्याने तेथे दोन प्लशिंग पॉईंट संबंधित दुय्यम अभियंता यांच्या निर्देशाप्रमाणे करण्यात आले.

सदर प्लशिंग पॉईंट काढण्याचे काम प्रचलित धोरणानुसार न झाल्याने संबंधित दुय्यम अभियंता यांची दिनांक २८.०३.२०२३ रोजी बदली करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेने समाज कल्याण विभागांतर्गत आडगाव वसतीगृहाला पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(४१) ७१०१७ (१२-०९-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेने समाज कल्याण विभागाअंतर्गत आडगाव वसतीगृहाला पाणीपुरवठा बंद ठेवल्याने वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पाण्याविना राहावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांना कोणत्याही सूचना न देता पाणीपुरवठा बंद केल्याने येथील विद्यार्थी आणि नागरिकांचे पाण्याविना गैरसोईला सामोरे जावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आडगाव शिवारात असलेल्या समाज कल्याण वसतीगृहात तातडीने कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०२-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) महानगरपालिकेने सदर वस्तीगृहाचा पाणी पुरवठा बंद केलेला नाही. मे महिन्यात उन्हाळा असल्याने व धरणावरील विद्युत पुरवठा सारखा खंडीत होत असल्याने पाणी पुरवठा काही प्रमाणात कमी होत होता.तथापी मागणीनुसार व आवश्यकतेनुसार मनपा मार्फत टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत होता.
(३) सद्यस्थितीत २ इंची ५ नळ कनेक्शन देण्यात आलेले असुन नविन २ इंची २ नळ कनेक्शनला तातडीने परवानगी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी व तळेगांव (शा.पं.) आगाराकरिता ३० नवीन बसेस मंजूर करण्याबाबत**

**(४२) ७१४४८ (३१-०८-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी व तळेगांव (शा.पं.) असे दोन बस आगार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी व तळेगांव (शा.पं.) आगारातील बसेसची संख्या अत्यंत कमी असून बसेसची दूरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवास करताना मध्येच बसेस बंद पडणे, पावसाळ्याचे दिवसात छतावरुन पाणी गळणे त्यामुळे प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांना आर्वी व तळेगांव (शा.पं.) बस आगाराकरिता नवीन ३० बसेस मिळण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदुनसार आर्वी व तळेगांव (शा.पं.) आगाराकरिता नवीन ३० बसेस देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२४) :** (१) होय.

(२), (३) नाही.

सद्य:स्थितीत आर्वी आगारात एकूण ४९ बसेस उपलब्ध असून ४४ नियते व तळेगांव आगारात एकूण २० बसेस उपलब्ध असून १८ नियते चालनात असून आर्वी व तळेगांव आगारातील चालनीय नियतांच्या संख्येच्या तूलनेत पूरेशी वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(४) होय.

(५) व (६) आर्वी आगारास १० बसेस वाटप करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ०३ निमआराम बसेस आर्वी आगारास प्राप्त झाल्या असून उर्वरीत बसेस लवकरच देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

## मुंबई शहरातील वाढलेल्या फेरीवाल्यांच्या संख्येबाबत

**(४३) ७१४८१ (०४-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविडच्या प्रादुर्भावानंतर मुंबईत अचानक फेरीवाल्यांची संख्या वाढलेली निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन फेरीवाल्यांचे कोणते सर्वेक्षण महानगरपालिकेने केलेले आहे किंवा कसे,

(३) तसेच, जुन्या फेरीवाल्यांना अधिकृत करून नवीन फेरीवाल्यांवर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, रेल्वे स्टेशन बाहेर १५० मीटर पर्यंत ना फेरीवाला झोन निश्चित केलेला असतना सुद्धा अनेक फेरीवाले व्यवसाय करताना दिसत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र शासनाने दिनांक ०१.०५.२०१४ रोजी लागू केलेला पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४, राज्य शासनाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिध्द केलेले महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ तसेच दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द केलेली पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र), योजना २०१७ यांमधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पथविक्रेता धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत होती.

तथापि मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. ६५२/२०१७ मध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून नव्याने प्राप्त निर्देशानुसार नव्याने नगर पथविक्रेता समिती गठीत करणेकरिता पथविक्रेता प्रतिनिधी सदस्यांची नेमणूक निवडणुक प्रक्रियेद्वारे करावयाची आहे. त्याकरिता आवश्यक मतदार यादी पथविक्रेता सर्वेक्षणातील पथविक्रेता म्हणून सिध्दतेची पडताळणी झालेल्या पथविक्रेत्यांमधून अंतिम करावयाची आहे. अशी यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आली असून त्याअनुषंगाने प्राप्त हरकती / सूचना यांवर निर्णय घेणेकरिता नगर पथविक्रेता समितीची बैठक प्रस्तावित आहे.

नगर पथविक्रेता समितीच्या निर्णयासापेक्ष अंतिम झालेली मतदार यादी पथविक्रेता प्रतिनिधी सदस्यांची निवडणूक प्रक्रियेद्वारे करण्याकरिता राबवावयाच्या निवडणूक प्रक्रियेसाठी कामगार आयुक्तांकडे पाठविण्यात येणार आहे.

नव्याने गठीत झालेल्या नगर पथविक्रेता समितीमार्फत राज्य शासनाने अंतिम केलेली पथविक्रेता योजना आणि उपविधी यांच्या अनुषंगाने पथविक्रेता धोरणाची पुढील अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. ६५२/२०१७ मध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, रेल्वे स्थानकांपासून १५० मीटर अंतरावर सिमांकन करण्यात आले असून, ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४

विभागांतील सहायक आयुक्त व वरिष्ठ निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) यांना स्टेशन परिसर फेरीवाल मुक्त ठेवण्याबाबतचे स्पष्ट निर्देश देण्यता आले आहेत.

सदर आदेशान्वये रेल्वे स्थानकापासून १५० मीटर परिसरात अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाविरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दैनंदिन पातळीवर नियमितपणे निष्कासनांची कारवाई करण्यात येते.

(५) सदर प्रकरणी सर्व महानगरपालिका / नगरपालिका यांना फेरीवाला धोरण २०१४ बाबतच्या कार्यपध्दतीबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

---

## मुंबईतील मुलुंड विभागातील विकास नियोजन आराखड्यातील रस्त्यांबाबत

**(४४) ७१४८३ (०४-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मुलुंड विभागातील अनेक रस्ते विकास नियोजन आराखड्यात ६ मीटर चे आहेत त्या मार्गावरील इमारतीचे पुनर्विकास शक्य होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास नियोजन आराखडा विनियोजनातील नवीन तरतुदी नुसार मुलुंड विभागातील सर्व ६ मीटर चे रस्ते मुलभूतरित्या ९ मीटर करण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील नियम ३० मधील तक्ता क्र. १२ नुसार ९ मीटरपेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यालगतच्या भूभागाचा विकास मूळ चटईक्षेत्र निर्देशांकानुसार होऊ शकतो असे नमूद करण्यात आले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रस्त्यांचे मुंबई महानगरपालिका १८८८ च्या प्रमाणे रुंदीकरण करण्याचे सर्वसमावेशक धोरण ठरविण्यात आले आहे.

सदर धोरणानुसार “टी” विभागात १३ रस्त्यांना ९.१५ मीटर रुंदीच्या नियमित रेषा मंजूर केलेल्या आहेत. तसेच भविष्यात “टी” विभाग कार्यालयाच्या समन्वयाने ९ मी. पेक्षा कमी रुंदी असलेल्या सार्वजनिक रस्त्यांचे प्राधान्यानुसार इत्यभूत सर्वेक्षण नकाशे प्राप्त झाल्यास ९.१५ मी. इतक्या रुंदीची, उर्वरित रस्त्यांना नियमित रेषा प्रस्तावित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील कै. भाऊराव हरिशचंद्र चेंबूरकर महानगरपालिका मंडईत सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(४५) ७१५०८ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील कै. भाऊराव हरिशचंद्र चेंबूरकर महानगरपालिका मंडईत तात्पुरत्या शेडची दुरवस्था झाल्याने मटण-मासे विक्रेते यांची शौचालय, पाणी व वीज या सुविधा नसल्यामुळे गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक सेवा-सुविधा पुरविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन आवश्यक त्या सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) चेंबूर येथील कै. भाऊराव चेंबूरकर महानगरपालिका मंडई धोकादायक (सी-१) म्हणून वर्गीकृत झाल्याने ती दिनांक २९.०६.२०२२ रोजी निष्कासित करण्यात आली व सदर मंडईतील मासळी, मटण व कोंबडी व्यावसायिकांकरिता तात्पुरत्या स्वरुपात शेड बांधण्यात आली. तथापि सदर ठिकाणी शौचालय, पाणी व वीज या सुविधा नाहीत, हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आलेल्या धोकादायक कै. भाऊराव चेंबूरकर महानगरपालिका मंडईतील व्यावसायिक (अनुज्ञापत्रधारक) तात्पुरत्या स्वरुपात बांधण्यात आलेल्या शेडमध्ये व्यवसाय करण्याऐवजी ते मंडईच्या मोकळ्या भूखंडावर एका बाजूला व्यवसाय करत आहेत. तथापि त्यांना पाणी, लाईट व शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे.
सदर मंडईच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन परवानाधारकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन होईपर्यंत तेथील अनुज्ञापत्रधारकांसाठी चांगल्या स्वरुपात ओटल्यासह आच्छादित शेडचे बांधकाम करणे बृहन्मुंबई महानगरपालकेने प्रस्ताविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील चेंबूरमधील सुभाषनगर म्हाडा वसाहतीतील मल:निसारण वाहिन्याबाबत

**(४६) ७१५१० (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चेंबूरमधील सुभाषनगर म्हाडा वसाहतीतील मल:निसारण वाहिन्या पावसाळ्यात भरून वाहत असल्यामुळे तेथील रहिवाश्यांना त्रासला सामोरे जावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) चेंबूर येथील सुभाषनगर परिसरातील रस्त्यावरील मलनि:सारण वाहिन्या पावसाळ्यात अतिवृष्टीदरम्यान अधिभारित असल्याच्या तक्रारी विविध माध्यमांद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होत असतात. सदर प्राप्त तक्रारींचे निराकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध वाहनविराजित संयंत्राद्वारे यांत्रिकीपध्दतीने त्वरीत केले जाते.
सदर समस्येचे निराकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुभाषनगर येथील रस्त्यांवर मलनि:सारण प्रकल्प विभागाकडून ६०० मि.मी. व्यासाची व रस्ते विभागाकडून ३०० मि.मी. व्यासाची नवीन मलनि:सारण वाहिनी टाकण्यात आल्या आहेत. सदर नवीन मलनि:सारण वाहिन्यांच्या जाळ्यांची जोडणी एन.जी. आचार्य मार्ग येथील मायक्रोटनेलिंग पध्दतीने टाकण्यात आलेल्या मलनि:सारण वाहिनींशी जोडणी करण्यात आलेली आहे.
तथापि, नवीन घाटकोपर उदंचन केंद्र येथील स्क्रीन चेंबरचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे एन.जी. आचार्य मार्ग येथील मायक्रोटनेलिंग पध्दतीने टाकण्यात आलेली मलनि:सारण वाहिनी कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. स्क्रीन चेंबरचे काम पूर्ण झाल्यानंतर सुभाषनगर येथील म्हाडा वसाहतीतील मलनि:सारण वाहिन्या अतिवृष्टीदरम्यान अधिभारित राहणार नाहीत व सदर समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील चेंबूर येथील घाटला गाव या आरक्षित भूखंडावर अनधिकृतपणे भराव केल्याबाबत

**(४७) ७१५११ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथील न.भू.क्र. ५८६/३ एन.बी. पाटील मार्ग, घाटला गाव हा भूखंड आरक्षित उद्यानाकरिता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडावर अनधिकृत भरणी करून गाड्या पार्किंगचा व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) चेंबूर येथील न.भू.क्र. ५८६/३ हा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर भूखंड विकास आराखडा २०३४ नुसार खेळाचे मैदान याकरिता आरक्षित असून अद्ययावत सुविधायुक्त आहे.
(२) सदर भूखंडाचे परिरक्षण बृहन्मुंबई महानगरपालिका नियुक्त कंत्राटदाराकडून करण्यात येत असून, सदर भूखंडाची दैनंदिन साफसफाई नियमित करण्यात येते. तसेच सदर भूखंडावर सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर भूखंडावर कोणत्याही प्रकारची अनधिकृत भरणी करुन गाड्या पार्किंगचा व्यवसाय सुरु नाही.
सदर भूखंड स्थानिक लहान मुले, नागरिक यांच्या वापराकरिता योग्य प्रकारे उपलब्ध आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहुल गाव रोड येथील महानगरपालिकेच्या शाळेशेजारी, महानगरपालिका गोडाऊन समोरील प्लॉटवर चालू असलेल्या अवैध भरणीबाबत

**(४८) ७१५१२ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील माहुल गाव रोड, चेंबूर येथील महानगरपालिकेच्या शाळेशेजारी, महानगरपालिका गोडाऊन समोरील प्लॉटवर अवैध भरणी चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता महानगरपालिका गोडाऊन समोरील प्लॉटवर सद्य:स्थितीत अवैध भरणी चालू असल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागामार्फत यापूर्वी सदर ठिकाणी मनपा स्वच्छता व आरोग्य उपनिधी २००६ नुसार रु. १०,०००/- इतका दंड वेळोवेळी आकारण्यात आला आहे.
तसेच, सदर ठिकाणच्या भरणीबाबत नजिकच्या पोलीस स्थानकात वेळोवेळी तक्रार अर्ज व संबंधित अज्ञान वाहनांवर कठोर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
यापुढे अवैध भरणी टाळण्याकरिता सदर भूखंड देखरेखीखाली ठेवण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चेंबुर येथील रस्त्यावरील उद्यानाच्या नुतनीकरण व सुशोभीकरणाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४९) ७१५२१ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चेंबुर येथील रस्त्यावरील उद्यानाच्या नुतनीकरण व सुशोभीकरणाच्या कामासाठी एम पश्चिम विभागास अंदाजे ३० करोड रुपये इतका निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम करताना जुने मटेरियल परत वापरून व काम न करता ठेकेदारांनी उक्त कामात गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) मुंबई सुशोभिकरण अभियानांतर्गत एम/पश्चिम विभागाकरिता सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात रु. ३०.५५ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
सदर प्रकरणी मुंबई सुशोभिकरण अभियान राबविताना सुशोभिकरणाच्या कामांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कामे करण्यात आलेली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिराळा व शाहूवाडी (जि.सांगली) तालुक्यातील गावातील प्रवाशांकरीता कराड-आरळा-कराड बस फेऱ्या पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(५०) ७१५७९ (१५-०९-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२३ मध्ये शिराळा व शाहूवाडी तालुक्यातील कराडकडे येणाऱ्या प्रवाशांचा विचार करुन शेडगेवाडीपर्यंत सुध्या सुरु असलेली बसफेरी ही पुढे मौजे आरळा या गावापर्यंत पूर्ण दिवसभरात अर्ध्या-अर्ध्या तासाने कराड-आरळा-कराड व कराड-आरळा मुक्कामी अशी बस सेवा सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कराड आगार, व्यवस्थापकांनी दिवसभरात अर्ध्या-अर्ध्या तासाने सुरु असलेली कराड-आरळा-कराड बस सेवा ही मुबलक प्रवाशी असणे, एकही बस फेरी रिकामी जात नसणे तसेच एसटी महामंडळाचे कोणतेही आर्थिक नुकसान होत नसताना गेल्या दोन महिन्यापासून बंद केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बस सेवा सुरु असल्याने शिराळा तालुक्यातील शेडगेवाडी पासून पुढे असलेली १० किलोमीटवर असलेली मणदूर, सोनवडे, आरळा, करुंगली, काळंद्रे, पणुंब्रे वारुण, चरण, मोहरे व नाठवडे ही गावे व वाडया-वस्त्या तसेच शाहूवाडी तालुक्यातील ऊखूळ, शित्तुर-वारुण, डिगे शिराळे, खेडे तसेच सोंडोली व त्यांच्या वाडया-वस्त्या या ग्रामीण भागातील विद्यार्थी/विद्यार्थींनी पुढील शिक्षणाकरिता संतकृपा घोगाव, डी.एड कॉलेज उंडाळे, बी.एस.सी. कॉलेज, येळगांव तसेच कराड येथील वाय.सी. कॉलेज, संत गाडगेबाबा कॉलेज, अभियांत्रिकी कॉलेज, फार्मसी कॉलेज व आयटीआय कॉलेज या ठिकाणी शिक्षणासाठी प्रवेश घेतला असून उक्त बस सेवा बंद केल्याने विद्यार्थ्यांना नाहक त्रास व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच कराड हे व्यापारी पेठ तसेच तेथे आरोग्य विषयक चांगले हॉस्पिटल असल्याने उक्त ठिकाणच्या वयोवृध्द, पुरुष, स्त्रीया तसेच बालक या रुग्णांना तसेच उपचाराकरिता तसेच सामान्य नागरिकांना जावे लागत उक्त बस सेवा बंद केल्याने तेथील स्थानिकांना खाजगी प्रवासी वाहतूक करावी लागत असल्याने अनेक अडचणी व आर्थिक भूर्दंद सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त परिस्थिती विचारात घेवून उक्त गावांपैकी काही गावानी तसेच मुळ आरळा गावांच्या ग्रामस्थांच्यावतीने सरपंच, आरळा यांनी उक्त बस सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत आगार व्यवस्थापक, कराड यांना समक्ष दिनांक १३ जुलै, २०२३ रोजी निवेदन दिले असतानाही आजमितीस उक्त बस सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त निवदेनाच्या अनुषंगाने सध्या कराड-शेडगेवाडी ही बस पुढे कराड-आरळा बस सेवा पूर्ववत सुरु करण्यासाठी तसेच उक्त परिस्थितीचा विचार करता बस सेवा सुरु करण्यास विलंब लावणाऱ्या आगार व्यवस्थापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०१-२०२४) :** (१) व (२) दि.१७.०५.२०२३ ते दि.१८.०६.२०२३ या कालावधीत प्रवाशांच्या सुचनेनुसार प्रायोगीक तत्वावर कराड-शेडगेवाडी या फेऱ्या आरळा पर्यंत विस्तारीत करण्यात आल्यानंतर सदर फेऱ्यांना अपेक्षित भारमान प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले असल्याने तसेच रा.प.शिराळा आगाराच्या शिराळा-आरळा या मार्गावरील फेऱ्यांना रा.प.कराड आगाराच्या फेऱ्या समांतर होत असल्यामुळे कराड-आरळा या फेऱ्या पूर्वी प्रमाणे कराड ते शेडगेवाडी पर्यंतच चालविण्यात येत आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

रा.प.कराड आगाराकडून आरळा परिसरातील पूर्वीप्रमाणेचे कराड-मणदूर सकाळी ११.०० वा. कराड-आरळा १९:००/०५:४५, कराड-सोंडवली २०:३० मु.कराड-पुणंब्रे मु.१९:३०/०६:३० अशा दिवसभरात फे-या चालनात आहेत. त्याचप्रमाणे रा.प.शिराळा आगाराच्या शिराळा-आरळा मार्गावर दैनंदिन २६ फे-या चालनात आहेत व रा.प.कराड आगाराकडून कराड-शेडगेवाडी मार्गावर ५४ फे-या दैनंदिन चालनात आहेत. त्यामुळे आरळा मार्गावरुन कराडकडे येणारे विद्यार्थी व प्रवाशी आरळा-शिराळा फे-यांमधून शेडगेवाडी पर्यंत प्रवास करित आहेत व तेथून कराडकडे येणारे विद्यार्थी व प्रवाशी शेडगेवाडी-कराड फे-यांमधून प्रवास करित आहेत. त्यामुळे विद्यार्थी व प्रवाशी तसेच व्यापारी व रुग्णालयात उपचाराकरिता येणारे रुग्ण याची कोणतीही गैरसोय तसेच आर्थिक नुकसान होत नाही.

(५) व (६) नाही.

सरपंच ग्रामपंचायत आरळा यांनी दि.१५.०७.२०२३ रोजी दिलेल्या निवेदनानुसार सध्या कराड- शेडगेवाडी मार्गावरील सकाळी ९.००,११.०० व १७.०० वा. च्या जाता-येता ३-३ फे-या आरळापर्यत विस्तारीत करण्यात आल्या आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.